म्हाडा MHADA

# कार्यकारी अभियंता / ई-१ विभाग

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (म्हाडाचा घटक)

तळ मजला, इमारत क्र. ३४,अभ्युदय नगर,काळाचौकी, मुंबई - ३३

ई मेल - rreee1mhada@gmail.com

**म्हाड अधिनियम १९७६ मधिल कलम ७७(ब) अंतर्गत धोक्याचे सूचनापत्र**

जा.क्र. का. अभि./ई-१ विभा. 1450 /२०२५
दिनांक 16/05/2025

प्रति,

**सर्व भाडेकरु/ रहिवाशी**
इमारत क्र. १०, रोचा बिल्डिंग,
हाथीबाग रोड, माझगाव, मुंबई - ४०० ०१०
(इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी)

**मालक - श्रीमती पी. एम. पारेख,**
१४, हिंदु कॉलनी, लक्ष्मी निवास,
सर भालचंद्र रोड, दादर मुंबई - ४०० ०१४.
(कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नोंदीनुसार)

**विषय :-** उपकरप्राप्त 'इमारत क्र. १०, रोचा बिल्डिंग, हाथीबाग रोड, माझगाव, मुंबई - ४०० ०१०' च्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा सूचना (उपकर क्र.ई- ६२०५(१).

**संदर्भ :-** मे.अशोक भोजराज काजणे यांनी या कार्यालयास दि.०२.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला संरचनात्मक परिक्षण अहवाल.

महोदय/ महोदया,

या कार्यालयातर्फे विषयांकित इमारतीचे मे.अशोक भोजराज काजणे यांनी संरचनात्मक परिक्षण केले आहे. त्याअनुषंगाने मे.अशोक भोजराज काजणे यांनी संदर्भाधिन पत्रान्वये संरचनात्मक परिक्षण अहवाल या कार्यालयास सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने विषयांकित इमारतीची वर्गवारी **C-1** म्हणजेच **To be demolished** अशी नमूद करण्यात आली आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने विषयांकित इमारतीची दि.०५.०५.२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळपाहणी केली असता, इमारत धोकादायक असल्याची या कार्यालयामार्फत निश्चिती करण्यात आली. सबब आपणास या सूचना पत्रान्वये विषयांकित इमारतीच्या धोकादायक संरचनात्मक स्थितीबाबत इशारा देण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी म्हाड अधिनियम १९७६ मधिल कलम ७७(ब) अन्वये आपणास सूचित करण्यात येते कि, विषयांकित इमारतीत वास्तव्य करणे धोकादायक असून आपण आपली सदनिका तातडीने रिक्त करुन इमारत निष्कासित करावी. आपणास पर्यायी निवासस्थानासाठी म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील गाळ्याची आवश्यकता असल्यास आपण या कार्यालयास खालील नमूद कागदपत्रांच्या मूळ प्रती व त्यांच्या छायांकित प्रतींचे दोन संच तसेच सोबत आपली पासपोर्ट आकाराची ०८ छायाचित्रे या कार्यालयास सादर करावीत, जेणेकरुन आपणास संक्रमण शिबीरातील गाळा उपलब्ध करुन देण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया सुरु करणे या कार्यालयास शक्य होईल.

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| १. | भाडेपावती - दि.१३.०६.१९९६ पूर्वीची व सध्याची | सदर कागदपत्रे विषयांकित इमारतीत आपण वास्तव्यास असलेल्या गाळ्याशी संबंधित असणे आवश्यक आहे. |
| २. | शिधापत्रिका - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे | |
| ३. | निवडणूक ओळखपत्र - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे | |
| ४. | विद्युत देयक - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याचे | |
| ५. | दुरध्वनी देयक - दि.१३.०६.१९९६ पूर्वीचे व सध्याचे | |

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | शेरा |
|---|---|---|
| ६. | आधारकार्ड व पॅनकार्ड | वरिल प्रमाणे |
| ७. | पारपत्र / वाहन चालक परवांना, इत्यादी. | |
| ८. | इमारतीतील वास्तव्याबाबतचे इतर पुरावे | |

उपरोल्लेखित बाबींची पूर्तता करुन आपण आपला गाळा निष्कासित करुन इतरत्र स्थलांतरीत झाला नाहीत व इमारतीत आपले वास्तव्य सुरु ठेवलेत आणि त्या कालावधीत इमारतीत पडझडीने अपघात घडून जीवित अथवा वित्त हानी झाल्यास, त्यास सर्वस्वी आपण जबाबदार रहाल याची आपण **गांभिर्याने** नोंद घ्यावी.

आपली विश्वासू ,

15/05/2025

**कार्यकारी अभियंता**

ई-१ विभाग / मुं.इ.दु व पु.मंडळ

**प्रत,**

- मा.मुख्य अधिकारी/ मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सविनय सादर. (ई-ऑफिसद्वारे रवाना)
- उपमुख्य अभियंता (परिमंडळ-३) / मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सादर. (ई-ऑफिसद्वारे रवाना)
- उपमुख्य अधिकारी (सं.गा.) / मुं.इ.दु व पु.मंडळ यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित. (ई-ऑफिसद्वारे रवाना)
- मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी/ प्राधिकरण यांस माहितीस्तव तथा म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेकामी रवाना. (ई-ऑफिसद्वारे रवाना)
- मुख्य जनसंपर्क अधिकारी/ प्राधिकरण यांस माहितीस्तव तथा सदर सूचनापत्र मराठी व इंग्रजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करणेकामी रवाना. (ई-ऑफिसद्वारे रवाना)
- सहाय्यक आयुक्त, ई-विभाग, मनपा, यांस माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.
- वरिष्ठ पोलिस निरिक्षक, भायखळा पोलिस ठाणे यांस माहितीस्तव रवाना.
- वरिष्ठ अग्निशमन अधिकारी, भायखळा अग्निशमन केंद्र यांस माहितीस्तव रवाना.
- इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविणेसाठी
  - इमारतीच्या घरमालकाची नोंद या कार्यालयात उपलब्ध असलेल्या अभिलेखाच्या अनुषंगाने नमूद करण्यात आलेली आहे. तथापि सदर नोंदीव्यतिरिक्त इमारतीच्या मालकीचे अन्य दावेदार असल्यास त्यांनी व इमारतीच्या सर्व भाडेकरु/ रहिवाशी यांनी सदर धोक्याच्या सूचनेची दखल घेणेकामी या नोटीशीच्या प्रती पंचनाम्यासहित इमारतीच्या दर्शनी भागावर चिकटविण्यात येत आहेत.